

# धक्का!!

सुराज्य सोलापूर



# नेत्यांच्या कोलांटउड्या

# फायद्याच्या की तोट्याच्या ?

सोलापूर : महाविकास आघाडी आणि महायुती यांच्यामध्ये 'बिग फाईट' होत असलेल्या सोलापूर लोकसभेच्या मतदार संघात अनेक नेतेमंडळींचे वेगवेगळ्या पक्षात इनकमिंग झालं. संबंधित नेते मंडळींचे नेतृत्व ज्या पक्षात प्रवेश झाला त्या पक्षाच्या उमेदवारासाठी उपयोगी ठरेल अशी अटकळ बांधण्यात आली आहे. अशा पक्षांतर केलेल्या नेतेमंडळींच्या नेतृत्वाचासुद्धा फैसला आज होत आहे. दरम्यान, त्या नेते मंडळींनी केलेल्या पक्षांतराच्या उड्यांचा प्रत्यक्ष फायदा किती झाला याचे उत्तर लोकसभा निवडणुकीच्या मतमोजणीतून ४ जूनला मिळणार असलं तरी याबद्दलचा उत्सुक्य प्रचंड मोठा आहे.









### देवेंद्र कोठेंच्या हाती 'कमळ' मताधिक्य राम सातपुतेंना



काँग्रेस आणि त्यानंतर शिवसेना असा राजकीय प्रवास झालेल्या सोलापुरातील प्रस्थापित कोठे परिवारातील माजी नगरसेवक देवेंद्र कोठे यांनी लोकसभेच्या निवडणुकीच्या धामधुमीत भाजपमध्ये प्रवेश केला आहे. त्यांच्या पक्षांतराचे पडसाद मोठे उमटतील. त्यांच्या समर्थकांची मतांची ताकद उमेदवार राम सातपुते यांच्या पाठीशी उभी राहील.

### चाकोते परिवारातील फाटाफूट भाजप उमेदवाराला फायद्याची



सोलापुरातील दिग्गज आणि प्रस्थापित चाकोते घराण्यात फाटाफूट झाली आहे. या परिवारातील रंजिता चाकोते यांनी केलेला भाजप प्रवेश लोकसभेला फायद्याचा ठरत आहे. रंजीत चाकोते यांचं महिला आघाडीमध्ये असलेलं काम पर्याय महिला आघाडी मधील मोठी मताधिक्याची ताकद उमेदवार राम सातपुते यांना मिळत आहे.

### आखरी बार भगीरथ भालके



अभिजित पाटील गटानं भाजपला पाठिंबा दिल्यानंतर त्यांचे कडवे विरोधक भगीरथ भालके यांनी प्रत्यक्ष मतदान प्रक्रियेची घटिका अवघ्या काही तासांवर आली असतानाच मोहिते-पाटील यांना आपल्या गटाचा पाठिंबा दिला. त्यांच्या राजकीय वजनाचा फायदा मोहिते-पाटलांना किती होणार? हे मतमोजणीतून समजून येईल.

पूर्वाश्रमी शिवसेनेत असलेल्या माजी आमदार दिलीप माने यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. दक्षिण विधानसभा मतदारसंघातून निवडणुकीसाठी इच्छुक असलेल्या माने यांनी लोकसभेच्या आडून विधानसभेची तयारी केली तथापि उत्तर आणि दक्षिण सोलापूर तालुक्यात त्यांचं मोठं राजकीय वलय आहे त्याचा फायदा सोलापूर लोकसभेच्या काँग्रेसचे उमेदवार प्रणिती शिंदे यांना कितपत होणार? हे पाहणं महत्त्वाचं आहे. या दोन्ही तालुक्यातून प्रणितींना चांगलं मताधिक्य मिळावं यासाठी त्यांनी चांगली फिल्डिंग लावली.

पंढरपूर तालुक्यात श्री विठ्ठल कारखान्याचे अध्यक्ष अभिजित पाटील यांनी लोकसभा निवडणुकीच्या ऐन रणधुमाळीत भाजपला पाठिंबा दिला. माढा लोकसभेच्या मतदार संघात समाविष्ट असलेल्या पंढरपूर तालुक्यातील ५८ आणि सोलापूर लोकसभेत असलेल्या या तालुक्यातील ३९ गावांमध्ये पाटील यांच्या नेतृत्वाचं चांगलं वजन आहे. त्यांच्या राजकीय ताकदीचा माढ्याचे उमेदवार खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर आणि सोलापूरचे उमेदवार आमदार राम सातपुते यांना कितपत होणार? हे पाहणं महत्त्वाचं मानलं जात आहे. ऐन निवडणुकीच्या निर्णय टप्प्यावर पाटील यांचा भाजपच्या वळचणीला जाण्याचा निर्णय राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटासाठी मात्र मोठा धक्कादायक ठरला. अभिजित पाटील यांच्या बदलत्या भूमिकेने माढ्याचे उमेदवार धैर्यशील मोहिते-पाटील यांना दे धक्का बसला. कारण मोहिते-पाटील यांची पंढरपूर तालुक्यातील मताधिक्याची सगळी मदार अभिजित पाटील यांच्यावर होती. ज्येष्ठ नेते शरद पवार यांचे अत्यंत विश्वासू आणि निकटवर्तीय असलेल्या अभिजित पाटील यांनी माढ्यासाठी मोहिते-पाटील यांचं यांचं तर सोलापूर लोकसभेसाठी आमदार प्रणिती शिंदे यांचे जोरदारपणे काम सुरू केलं होतं. पण आता ते भाजपाच्या उमेदवारांचे काम करताहेत.

नेते मंडळींच्या बदलत्या भूमिकेचे पडसाद मोहोळ तालुक्यात देखील उमटतील. पूर्वाश्रमीचे भाजपचे नेते संजय क्षीरसागर यांच्यासह त्यांच्या समर्थकांनी भाजपाला सोडचिट्ठी देऊन राष्ट्रवादी शरद चंद्र पवार गटाची तुतारी हाती घेतली. त्यांच्या या पक्षांतराचा फटका काही प्रमाणात भाजपाचे उमेदवार राम सातपुते यांना बसणार आहे. धनगर समाजासह अन्य काही समाजात नेतृत्वाचे वजन असलेल्या क्षीरसागर गटाच्या मतांची ताकद महाविकास आघाडीचे उमेदवार प्रणिती शिंदे यांच्या पाठीशी लागणार आहे.

याच तालुक्यात शरद पवार यांच्या राष्ट्रवादी गटात असलेल्या माजी नगराध्यक्ष रमेश बारसकर यांनी ऐन लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर वंचित आघाडीमध्ये प्रवेश करून या पक्षाच्या तिकिटावर माढा लोकसभेच्या मतदारसंघात नशीब आजमावण्याचा प्रयत्न ठेवला आहे. मोहोळ शहरात बारसकर यांना मानणारा गट आहे. या गटाची मतं वंचित बहुजन आघाडीने पुरस्कृत केलेल्या सोलापूर लोकसभा मतदारसंघातील उमेदवार अतिश बनसोडे यांच्या पाठीशी लागणार हे उघड आहे.

एमआयएम पक्षाचे पदाधिकारी कोमोरो सय्यद यांच्यासह अन्य काही जणांनी या पक्षाचा पतंग बाजूला करून काँग्रेसचा हातात हात घेतला. सहाजिकच या पदाधिकाऱ्यांसमवेत असलेली मतांची ताकद काँग्रेसचे उमेदवार प्रणिती शिंदे यांना मिळणार आहे. समाजसेवक तथा उद्योजक महादेव कोगनुरे यांनी आपल्या समर्थकांसह काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे. दक्षिण विधानसभेवर डोळा ठेवून असलेल्या कोगनूरे यांच्या काँग्रेस पक्षात जाण्याचा फायदा प्रणिती शिंदे यांनाच होणार आहे.

माढा लोकसभेतही पक्षांतराचे परिणाम मोठ्या प्रमाणावर जाणवणार आहेत. पूर्वाश्रमी धनुष्यबाण हातात राहिलेले शिवाय शिंदे बंधूंचे कट्टर विरोधक टेंभुर्णी- माढ्याचे संजय कोकाटे यांनी धनुष्यबाण बाजूला ठेवून राष्ट्रवादी शरद चंद्र पवार गटाची तुतारी हातात घेतली आहे लोकसभेच्या या निवडणुकीसाठी त्यांनी आपले पूर्वाश्रमीपासूनचे स्नेही मोहिते-पाटील यांना पाठिंबा दिला आहे.

याच माढा लोकसभेच्या मतदारसंघात माळशिरस तालुक्यात पक्षांतराचा मोठा राजकीय भूकंप झाला. भाजपाच्या वळचणीला असलेल्या मोहिते-पाटील यांनी हातामधील कमळ बाजूला करून राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाची तुतारी हातात घेतली. याच पक्षाच्या तुतारी चिन्हावर धैर्यशील मोहिते पाटील हे माढा लोकसभेची निवडणूक लढवीत आहेत. मोहिते पाटील परिवार भाजपातून जाण्यानं आणि शरद पवार गटाच्या तुतारी चिन्हावर लोकसभेची निवडणूक लढविण्याचे काय पडसाद उमटतात हे ४ जूनला समजणार आहे. याच माळशिरस तालुक्यातील आणखी एका पक्षांतराने हा तालुका राज्याच्या चर्चेत आला. राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते उत्तम जानकर यांनी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटात प्रवेश केला. माळशिरस विधानसभेची गणित घालून मोहिते पाटील यांच्यासोबत साधारण ४० वर्षाचं राजकीय वैर संपवलं. वास्तविक उत्तम जानकर यांच्या शरद पवार गटात जाण्यानं शिवाय मोहिते पाटील यांच्याबरोबर सुत जुळवून घेण्यानं लोकसभेच्या निवडणुकीत नेमका काय चमत्कार घडणार? हे मतमोजणी नंतरच समजणार आहे. मोहिते पाटील आणि जानकर हे एकत्र येण्यातून भाजपच्या उमेदवाराला त्याचा कितपत फटका बसेल हे पाहणं जसं महत्त्वाचा आहे तसं दुसरीकडं जानकर आणि मोहिते-पाटील यांच्या एकत्र येण्यानं नाराज झालेल्या संबंधितांनी सर्वपक्षीय आघाडी स्थापन केली. या सर्व पक्षीय आघाडीची मोठी ताकद भाजपाचे उमेदवार रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांच्या पाठीशी लागणार आहे.

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, करमाळा तालुक्यातदेखील पक्षांतराचं वारं वाहिलं आहे. बागल गटाच्या नेत्या रश्मी बागल-कोलते यांनी भाजपात प्रवेश केला आहे. खासदार नाईक निंबाळकर यांना त्यांच्या या प्रवेशाचा फायदा होईल. याच तालुक्यातील माजी आमदार नारायण पाटील हे शिवसेनेत होते. त्यांनी या पक्षाला जय महाराष्ट्र करून राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाची तुतारी हातात घेतली आहे. त्यांच्या या पक्षांतराचा फायदा मोहिते पाटील यांच्या उमेदवारीला होणार आहे. तसं तर करमाळ्याचे पाटील हे मोहिते पाटील यांचे समर्थक पूर्वीपासून मानले जातात.

माढा तालुक्यातील सोलापूर जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागाचे माजी सभापती शिवाजी कांबळे यांच्यासह काहीजणांनी पक्षांतर केला आहे. त्यांच्या या पक्षांतराचा फायदा धैर्यशील मोहिते पाटील यांच्या उमेदवारीला होणार आहे.



# सकाळी तळ्यात, दुपारी मळ्यात, रात्री खळ्यात!

## ही निवडणूक आहे का महाभारताचे युध्द

विकास चाटी
सोलापूर

सोलापूर लोकसभा मतदारसंघातील जाहीर प्रचार आता संपला आहे. मात्र या प्रचारादरम्यान नेत्यांच्या बदलत्या भूमिका, बदलते विचार हे खरोखर मतदारांची मती गुंग करणारे ठरले. प्रचार करताना दोन्ही बाजूंकडून इतकी पराकोटीची चिखलफेक झाली की ही निवडणूक आहे का महाभारत असे म्हणण्याची वेळ आली. आपणच लायक आणि श्रेष्ठ आहोत हे दाखविताना विरोधकांवर खालच्या पातळीवर जी टिका झाल्या त्याच्या मर्यादा ओलांडल्या गेल्या. वैयक्तीक टीका-टिपणीवरुन जनतेचं चांगलंच मनोरंजन झालं. ही निवडणूक नेत्यांच्या अचंबित करणाऱ्या बदलत्या भूमिकांनी गाजली. जिल्ह्यातील पुढारी हे नेते आहेत का अभिनेते ? अशी शंका यावी अशा कुतुहलपूर्ण व मनोरंजक भूमिका त्यांनी घेतल्या.

आचारसंहिता लागली तशा विविध पक्षातील नेत्यांनी आपल्या भूमिका बदलायला प्रारंभ केला. काहींनी लोभाने तर तर काहींनी कारवाईच्या भितीपोटी भूमिकेत बदल करून चक्क ज्यांना विरोध करत होते, त्या पक्षालाच मदत करण्याचा निर्णय घेतला. याची सुरुवात झाली ती माजी आमदार दिलीप माने यांच्यापासून. दिलीप माने यांनी यापूर्वी ज्यांच्या विरोधात भूमिका मांडली त्या सुशीलकुमार शिंदे यांच्याशी जुळवून घेतले. त्यांची ही भूमिका पर्यायानं विचार दक्षिण सोलापूर मतदारसंघाची विधानसभेची काँग्रेसची उमेदवारी मिळवण्यासाठीच होती, हे कोणीही सांगेल.

दुसरीकडे उत्तर सोलापूर व शहर मध्य या दोन्ही मतदारसंघात प्राबल्य असलेले माजी महापौर महेश कोठे यांनीही महाआघाडीचा धर्म पाळत काही वर्षांपासून कट्टर विरोध केलेल्या सुशीलकुमार शिंदे यांच्याशी जुळवून घेण्याचा निर्णय घेतला. शहर मध्य विधानसभा मतदारसंघातून प्रणिती यांच्याविरुद्ध सलग तीन वेळा हरलेले माकपचे नेते माजी आमदार नरसय्या आडम यांनीही कट्टर विरोध सोडून प्रणिती यांना लोकसभेला पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला. आम्हाला शहर मध्य विधानसभा मतदारसंघ सोडा अशी अटही घातली.

साधारण दीड महिन्यापूर्वी त्यांनी रे नगर गृहप्रकल्पातील लाभार्थींना घराच्या चाव्या देण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी आले असता त्यांची स्तुती करत या प्रकल्प मंजुरीसाठी २०१४ पूर्वीचे काँग्रेस सरकार, सुशीलकुमार शिंदे यांना घातलेला खोडा आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेली मदत याचा छाती पिटून उल्लेख केला होता. लोकसभा निवडणूक लागली त्यांनी भूमिका १८० अंशात बदलून मोदींनी कसे वाईट केले असे सांगत प्रणितींच्या मदतीसाठी कुमक रवाना केली.

पंढरपूरला भाजप विरोधात ठामपणे उभा राहिलेला नेता अशी प्रतिमा निर्माण केलेले अभिजित पाटील यांनी त्यांच्या ताब्यातील श्री विठ्ठल साखर कारखान्यातील साखर गोदाम सील केल्यानंतर अचानकपणे आपल्या भूमिकेत बदल केला. धैर्यशील मोहिते-पाटील यांच्यासाठी आयोजित प्रचार सभेतून त्यांनी कोणाचा तरी फोन आल्यावर सभा नाट्यमयरितीनं सभा सोडून जाणे पसंत केले. त्यानंतर त्यांचे पुढचं वक्तव्य हे भाजपला पाठिंबा देणार असेच बाहेर आले.

दीड वर्षापासून दक्षिण सोलापूर मतदारसंघात आपलं स्थान निर्माण करण्यासाठी धडपडणाऱ्या महादेव कोगनुरे यांनी भाजपा व काँग्रेस या दोन्ही पक्षांच्या नेत्यांच्या गाठीभेटी घेतल्या. त्यांच्या कार्यकर्त्यांच्या म्हणण्यानुसार ते इतक्या लवकर कुठल्याही उमेदवाराला पाठिंबा देण्याचा निर्णय जाहीर करतील असे वाटत नव्हते. मात्र, कोगनुरे यांनी शेवटच्या टप्प्यात अचानकपणे काँग्रेसमध्ये प्रवेश करत धक्का दिला.

### माढ्यातील बंडाचे नाटक तुफान तेजीत

माढा लोकसभा मतदारसंघात तर भाजपाचे अत्यंत घनिष्ठ नेता अशी ज्यांची ख्याती होत होती त्या मोहिते-पाटील परिवाराने उमेदवारीवरून पूर्णपणे विरोधी भूमिका घेतली. राष्ट्रवादीची तुतारी हातामध्ये घेत धैर्यशील मोहिते-पाटील यांनी भाजपचे उमेदवार विद्यमान खासदार रणजितसिंह नाईक- निंबाळकर यांच्यासमोर आव्हान उभे केले. याच मतदारसंघातील दुसरे नेते उत्तम जानकर यांनी तर कसलेल्या अभिनेत्याप्रमाणे भाजपला व देवेंद्र फडणवीस यांना गुगली टाकून बोल्ड केले. आपले भाजपविरोधातील बंड यशस्वी व्हावे, यासाठी मोहिते-पाटील परिवाराने जानकरांबरोबर असलेले आपले दोन तपांचे साप-मुंगसाचे वैर संपुष्टात आणले. 'तुम्ही आम्हाला लोकसभेला मदत करा, आम्ही तुम्हाला माळशिरस विधानसभेतून आमदार करु' असे आश्वासन मोहिते-पाटील यांनी जानकरांना दिले. दोघांच्या भूमिकेतील हे बदल दोघांच्याही समर्थकांना आश्चर्यचकित करुन गेले. त्याच्या समर्थनार्थ 'राजकारणात कोणीही कायमचा शत्रू नसतो' हा डायलॉग आळवण्यात आला. महाराष्ट्र भाजपचे सर्वेसर्वा देवेंद्र फडणवीस यांनी खास विमानाने उत्तम जानकरांना आपल्याकडे बोलवून त्यांना अनेक आश्वासने दिली. मात्र जानकरांनी भाजपला ठेंगाच दाखविला.

### दोन 'रमेशां'च्या मनोरंजक भूमिका

मोहोळ तालुक्यात रमेश बारसकर आणि रमेश कदम यांच्या भूमिकाही कधी तळ्यात कधी मळ्यात अशाच राहिल्या. बारसकरांनी राष्ट्रवादी शरद पवार गटातून सीमोल्लंघन करीत माढ्यातून वंचितची उमेदवारी मिळवली. तर रमेश कदम यांनी जाहीरपणे काँग्रेसला पाठिंबा न देता आपली ताकद भाजपच्याच पारड्यात घालत असल्याची हवा निर्माण केली. ज्यांच्यामुळे रमेश कदम यांना तुरुंगात जावे लागले त्यांच्याबद्दल त्यांच्या मनात राग असेल अशी भावना होती. मात्र आता कदमांची पावले कोणत्या दिशेने चालली आहेत हे कदम यांनाच सांगता येईल अशी परिस्थिती आहे. अकलूजमधील सिंहाच्या साम्राज्यातदेखील दलबदलाच्या डरकाळ्या झाल्या. कॉंग्रेसमध्ये असलेल्या डॉ. धवलसिंहांनी भाजपला पाठिंबा देण्याची भूमिका घेतली. गेली दोन दशकं भाजपचं 'कमळ' हुंगणाऱ्या मोहोळच्या संजय क्षीरसागारांनी अन्याय झाल्याची आरोळी देत भाजपविरोधात बंडखोरीचं आग्या मोहोळ उठवून शरद पवार गटाची तुतारी हाती घेतली.

### सर्वात कहर वंचितच्या राहुल गायकवाडांचा

कहर तर वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार राहुल गायकवाड यांनी केला. वंचितची उमेदवारी मिळाल्यानंतर शेवटच्या क्षणी आपला उमेदवारी अर्ज माघार घेतला आणि प्रकाश आंबेडकरांना तोंडघशी पाडले. एवढेच नाही काँग्रेसमध्ये प्रवेश करून त्यांनी प्रणिती शिंदे यांचा प्रचार करणार असल्याचे जाहीर केले.

# भालके गटानं भूमिका बदलली

## आता महाविकास आघाडीला पाठिंबा



पंढरपूर : राजकीयदृष्ट्या अत्यंत संवेदनशील असणाऱ्या पंढरपूर तालुक्याचं राजकारण अवघ्या काही तासात पुन्हा वेगळ्या वळणावर गेलं. श्री विठ्ठल परिवाराचे नेते अभिजित पाटील यांनी भाजपला पाठिंबा दर्शवून काही तास उलटतात तोच त्यांचे कट्टर राजकीय दुष्मन भगीरथ भालके गटानं आपली भूमिका तातडीने बदलत महाविकास आघाडीचे उमेदवार धैर्यशील मोहिते-पाटील यांना पाठिंबा दर्शवला.

दरम्यान, भालके गटानं प्रत्यक्ष मतदान प्रक्रियेच्या अवघ्या काही तासांपूर्वी मोहिते-पाटील यांना पाठिंबा जाहीर केला असला तरी पाठिंबा दिल्याचा प्रचार आणि प्रसार त्यांच्या समर्थकांमध्ये जाणार का यावर प्रश्नचिन्ह आहे. अत्यंत घाईगडबीत दिलेल्या पाठिंब्याचा फायदा मोहिते-पाटील यांना होणार नसल्याचं राजकीय जाणकरांनी सांगितलं.

आर्थिक संकटात सापडलेल्या श्री विठ्ठल साखर कारखान्याला वाचविण्यासाठी अभिजित पाटील यांनी आपल्या समर्थकांसह कालच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत भाजपला पाठिंबा जाहीर केला. कारखान्यांना सर्वोतोपरी मदत करण्याशिवाय अभिजित पाटील यांच्या आमदारकीबद्दलचा शब्द फडणवीसांनी दिला. त्याचे पडसाद पंढरपूर तालुक्याच्या राजकीय वर्तुळात तीव्रवणे उमटले. पाटील विरोधी गटाने लगेच भूमिका बदलत महाविकास आघाडीला आज आपला पाठिंबा जाहिर केला. पाठिंबा देण्याची पाटील आणि भालके गटात जणू स्पर्धाच दिसली.

भाजपचे उमेदवार आमदार राम सातपुते आणि खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांचं कामदेखील अभिजित पाटील गटानं जोरकसपणे सुरु केलं होतं.

माढा लोकसभा मतदार संघात समाविष्ट असलेले पंढरपूर तालुक्यातील ५८ गावातील मतदार महत्वपूर्ण भूमिका बजावू शकतात. या ५८ गावात विठ्ठल परिवाराशी संबंधित मतदार वर्ग मोठ्या प्रमाणात आहे. विठ्ठल परिवारातील कल्याणराव काळे हे महायुती सोबत आ-हेत. तर सुरुवातीच्या काळात मोहिते-पाटील यांच्या समवेत असलेले अभिजित पाटील यांनी भाजपला पाठींबा देत महायुतीचे उमेदवार रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांचा प्रचारही सुरु केला आहे. विठ्ठल परिवारातील दुसरे नेते युवराज पाटील आणि गणेश पाटील यांनी मात्र शरद पवार यांच्या प्रति असलेली निष्ठेची परंपरा अबाधित ठेवली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या प्रचारात नेटाने सक्रिय असल्याचे दिसून आले. तर आता विठ्ठल परिवारातील आणखी एक नेते भगीरथ भालके यांनीही धैर्यशील मोहिते पाटील यांना पाठींबा जाहीर केला आहे. भगीरथ भालके यांनी आपल्या काही प्रमुख समर्थकांशी चर्चा करीत शिवतेजसिह मोहिते-पाटील यांच्या उपस्थितीत आपला पाठिंबा जाहीर केला आहे.

या पंढरपूर तालुक्यातील ५८ गावे जी माढा लोकसभा मतदारसंघाला जोडलेली आहेत. त्या गावांमध्ये भालके व मोहिते पाटील समर्थक सोडले तर बाकीचे सगळे गट एकत्र झाले आहेत. येणाऱ्या लोकसभा निवडणुकीत भालके आणि मोहिते-पाटील विरुद्ध इतर असा सामना रंगणार आहे. त्यामुळे कोणाची ताकद किती हे येणाऱ्या लोकसभेच्या निवडणुकीत कळून येणार आहे.